# प्रेस नोट दि.१६/१०/२०२६ ला.प्र.वि. सांगली युनिट

**आरोपी लोकसेवक १) सुरेश बाळासोा पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), सांगली मिरज रा.बागणी ता.वाळवा जि.सांगली २) व इतर लोकसेवक सुरेश विठ्ठल लोंढे रा.अलंकार कॉलनी मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपये लाचेची मागणी केली व लाच देणेस प्रोत्साहन दिले बाबत. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली विभागाची कारवाई..**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सांगली |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | म.गांधी चौक पोलीस ठाणे, जि.सांगली |
| **गुन्हा नोंद क्रमांक व कलम** | ३१४/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे |
| **मुळ तक्रारदार** | पुरुष वय २५ वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय** | १) सुरेश बाळासोा पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध),सांगली मिरज रा.बागणी ता.वाळवा जि.सांगली<br>२) सुरेश विठ्ठल लोंढे वय ६४ वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त लेखा परिक्षक श्रेणी-१ सध्या सहकार विभागाचे अवसायक रा.शशीकला अलंकार कॉलनी, गल्ली नं.३ मिरज (इलोसे) |
| **पडताळणी कारवाई वेळी मागणी केलेली लाचेची रक्कम व दिनांक** | दि.३१/०८/२०२६ रोजी १५.४४ ते १८.०३ वा चे दरम्यान व दि.०४/०९/२०२६ रोजी १४.२९ ते १५.१८ वा.चे दरम्यान सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), सांगली मिरज कार्यालय येथे |
| **सापळा कारवाई वेळी स्विकारलेली लाचेची रक्कम** | निरंक |
| **सापळा कारवाई दिनांक व ठिकाण** | निरंक |
| **थोडक्यात हकीकत** | यातील आरोपी नं १ लोकसेवक सुरेश बाळासोा पाटील क्लार्क वर्ग-३ सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज यांनी दिनांक ३१/०८/२०२६ रोजी १५.४४ ते १८.०३ वा चे दरम्यान व दिनांक ०४/०९/२०२६ रोजी १४.२९ ते १५.१८ वा.चे दरम्यान आपले पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायद्या करिता मुळ तक्रारदार यांना श्री.पुनेश्वर मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या कामकाज बंद असले संस्थेचा सभासद व्हायचे असल्याने त्यांनी सदर संस्थेचे चेअरमन व सभासद यांनी संस्था पुर्नजिवन करणे बाबत दाखल केले अर्जा बाबत पुर्नजीवन सुनावणी निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लागण्यासाठी मुंबईच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना, तसेच मिरज कार्यालयातील स्टाफसाठी असे एकुण २,५०,०००/- रुपये लागणार असल्याचे सांगुन तडजोडी अंती २,००,०००/- रुपये मध्ये पुर्नजिवन आर्डर काढुन काम करुन देण्याची तयारी दर्शवुन तक्रारदार यांनी यापुर्वी दिलेले १,००,०००/- रुपये रक्कम मिळाली असल्याचे सांगुन ती रक्कम वळीत करुन राहिलेली १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली आहे. तसेच दिनांक ३१/०८/२०२६ रोजी १५.४४ ते १८.०३ वा चे दरम्यान आरोपी नं २ इतर लोकसेवक सुरेश विठ्ठल लोंढे यांनी लोकसेवक सुरेश बाळासोा पाटील क्लार्क व मुळ तक्रारदार यांचे संभाषणा मध्ये सहभागी होवुन लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क यांना तसेच मुंबई येथील कार्यालयात तक्रारदार यांना त्यांचे काम पुर्ण करुन घेण्यासाठी लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. म्हणुन वगैरे<br>आरोपी लोकसेवक १) सुरेश बाळासोा पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), सांगली मिरज रा.बागणी ता.वाळवा जि.सांगली वर्ग -३ व खाजगी इसम २) सुरेश विठ्ठल लोंढे रा.अलंकार कॉलनी मिरज यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **तपास अधिकारी** | श्री. योगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. सांगली |
| **मार्गदर्शन अधिकारी** | पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे,<br>अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे. |
| **सापळा पथक** | श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, तसेच पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, ऋषिकेश बडणीकर, मनोज निळकंठ,चंद्रकांत जाधव, पोपट पाटील,उमेश जाधव, प्रकाश जाधव, सुदर्शन पाटील, अजित पाटील, सागर नायकुडे, रामहरी वाघमोडे,सलीम मकानदार, धनंजय खाडे, राजेश मुदगल, महेश शेंडगे, चालक विठ्ठलसिंग राजपूत, जितेंद्र कदम |

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४, व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९४०४०४१०६४ वर संपर्क साधावा.

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

Yasmin

**(यास्मीन इनामदार)**
**पोलीस उप अधीक्षक**
अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली.